दैनिक औरंगाबाद

स्वतंत्र विचाराचे निर्भीड, निःपक्ष, दर्जेदार दैनिक

# विश्व मित्र

गुरुवार २९ जानेवारी २०१५

## बालकामगार शाळेत प्रजासत्ताकदिन साजरा

**औरंगाबाद - प्रतिनिधी**

आझाद अली शाह शिक्षण संस्थेद्वारे पडेगाव व निसर्ग कॉलनी येथे सचलीत राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प शाळेत या दोन्ही शाळेत प्रजासत्ताक दिन अतिशय हर्ष, उल्हासात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी ८.३० वाजता बालकामगार विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढून विद्यार्थ्यांनी बालमजुरी थांबविण्यासंदर्भात आपल्या हाती असलेल्या बॅनर मधुन संदेश दिला. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी खान साजिद पाशा हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. प्रमुख पाहुणे संस्थेच्या अध्यक्षा खान सुरैय्या उपस्थित होत्या.

सर्वश्री आलेल्या पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर माधा आवाड यांनी शाळेचा व संस्थेचा अहवाल सादर करुन, सांस्कृतिक कार्यक्रमास सुरुवात करण्या तआली. वेगवेगळ्या विषयावर वेगवेगळ्या वेशभुषा, नृत्य, गित आणि भाषणे करुन आलेल्या पाहुण्यांचे व पालकांचे कौतुक मिळविले.

संस्थेच्या अध्यक्षा खान सुरैय्या यांनी आपल्या भाषणातुन आपण बालकामगारांना ज्या सुविधा आतापर्यंत पुरवित होते. त्यापेक्षा जास्त सुविधा पुरविण्याचे आश्वासन देऊन जास्तीत जास्त प्रमाणात कसे बालकामगार मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणता येईल यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करण्याचे आवाहन केले तर खान साजिद पाशा यांनी आपल्याभाषणातुन बालकामगार मुलांनी कसे शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणता येईल हे सांगुन कोणत्याही पालकांनी आपल्या पाल्याला शिक्षणापासुन दुर लोटुन पाप करु नका अशी विनंती केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सय्यद नसरिन यांनी केले तर आभार प्रदर्शन आशा साळवे यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय सय्यद जिनत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शेख तमन्ना, मिना भालेराव, शेख शमशाद आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना, पालकांना खाऊ वाटप करुन करण्यात आली.

---

दैनिक भास्कर

14

### राष्ट्रीय बालकामगार स्कूल

[illegible]

---

आनंद नगरी

# औरंगाबाद नगरी

४

दि. ४ फेब्रुवारी २०१५

## बालकामगार शाळेत प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा

**औरंगाबाद :** आझाद अली शाह शिक्षणसंस्थे संचलित पडेगाव व निसर्ग कॉलनी येथील राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प शाळेत प्रजासत्ताकदिन अतिशय आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढून बालमजुरी थांबविण्यासंदर्भात बॅनरमधून संदेश दिला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर वेशभूषा, नृत्य, गीते आणि भाषणे सादर करून सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी प्रशासकीय अधिकारी खान साजीद पाशा हे अध्यक्ष, तर प्रमुख पाहुण्या म्हणून संस्थेच्या अध्यक्षा खान सुरैया यांची उपस्थिती होती.